श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

उद्धव गीता (11.10)



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्री कृष्ण तैयार।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
एकादशः स्कन्धः
॥ अथ दशमोऽध्यायः॥

श्रीभगवानुवाच
मयोदितेष्ववहितः(स्), स्वधर्मेषु मदाश्रयः ।
वर्णाश्रमकुलाचार- मकामात्मा समाचरेत् ॥ 1॥

श्रीकृष्ण म्हणतात - साधकाने सर्व प्रकारे मला शरण येऊन मी सांगितलेल्या आपल्या धर्माचे सावधपणे पालन करावे. निष्काम भावाने आपला वर्ण, आश्रम आणि कूळ यांचेही आचार पाळावेत.

अन्वीक्षेत विशुद्धात्मा , देहिनां(वँ) विषयात्मनाम् ।
गुणेषु तत्त्वध्यानेन, सर्वारम्भविपर्ययम् ॥ 2॥

स्वधर्मचरणाने ज्याचे चित्त शुद्ध झाले आहे, त्याने विषयांमध्ये आसक्त झालेले लोक विषयांना सुख मानून सुखासाठी जी कर्मे करतात, त्या कर्मांचा परिणाम दुःखदायक होतो, ही गोष्ट नीट ध्यानात घ्यावी.

सुप्तस्य विषयालोको , ध्यायतो वा मनोरथः ।

नानात्मकत्वाद् विफलस्- तथा भेदात्मधीर्गुणैः ॥ 3॥

जसे झोपलेला माणूस स्वप्नामध्ये अनेक विषय पाहतो किंवा जागेपणी मनाने ज्या विषयांचे चिंतन करतो, ते सर्व इंद्रियांनी दिसणारे व अनेक असल्यामुळे तो गोंधळून जातो, हे समजते, तसेच इंद्रियांद्वारे बाहेरील विषयांत जाणवणारी भेदबुद्धीसुद्धा खोटीच आहे.

निवृत्तं(ङ्) कर्म सेवेत , प्रवृत्तं(म्) मत्परस्त्यजेत् ।

जिज्ञासायां(म्) सं(म्)प्रवृत्तो, नाद्रियेत् कर्मचोदनाम् ॥ 4॥

ईश्वरारायण मनुष्याने नित्यानैमित्तिक कर्मांचेच आचरण करावे. सकाम कर्म कधीही करू नये. जेव्हा तो आत्मज्ञानासाठी प्रयत्नशील होईल, तेव्हा तर नित्य कर्मांचीही फिकीर करू नये.

यमानभीक्ष्णं(म्) सेवेत , नियमान् मत्परः(ख्) क्वचित् ।

मदभिज्ञं(ङ्) गुरुं(म्) शान्त- मुपासीत मदात्मकम् ॥ 5॥

अमान्यमत्सरो दक्षो , निर्ममो दृढसौहृदः ।

असत्वरोऽर्थजिज्ञासु- रनसूयुरमोघवाक् ॥ 6॥

माझ्या भक्ताने अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या यमांचे पूर्णपणे पालन करावे. शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान या नियमांचे आत्मज्ञानाला अडथळा येत नसेल तर यथाशक्ती पालन करावे. मला जाणणाऱ्या शांतस्वरूप गुरूजवळ जाऊन त्यांना माझेच स्वरूप समजून त्यांची सेवा करावी. कसल्याही अभिमान धरू नये. कोणाचाही मत्सर करू नये. नेहमी सावध असावे. 'माझे' पणाचा भाव सोडावा. गुरु आणि माझ्याबद्दल निःसीम प्रेम ठेवावे. तत्त्व समजून घेण्याची जिज्ञासा असणाऱ्याने कोणत्याही प्रकारची घाई करू नये. कोणाबद्दलही द्वेषबुद्धी ठेवू नये. निरर्थक आणि असत्य भाषण यांपासून दूर राहावे.

जायापत्यगृहक्षेत्र- स्वजनद्रविणादिषु ।

उदासीनः(स्) समं(म्) पश्यन्, सर्वेष्वर्थमिवात्मनः ॥ 7॥

पत्नी, पुत्र, घर, जमीन, आप्तेष्ट, धन इत्यादी सर्वांमध्ये एकच आत्मा असल्यामुळे सर्वांची सुखदुःखे स्वतःसारखीच आहेत, असा सगळीकडे समभाव ठेवून तटस्थ राहावे.

विलक्षणः(स्) स्थूलसूक्ष्माद्, देहादात्मेक्षिता स्वदृक् ।

यथाग्निर्दारुणो दाह्याद्, दाहकोऽन्यः(फ्) प्रकाशकः ॥ 8॥

आत्मा स्वयंप्रकाशी, सर्वांचा साक्षी आणि स्थूल व सूक्ष्म या दोन्ही देहांपासून तो पूर्णपणे वेगळा आहे. ज्याप्रमाणे जळणाऱ्या लाकडाहून जाळणारा व प्रकाश देणारा अग्नी वेगळाच असतो.

निरोधोत्पत्त्यणुबृहन्- नानात्वं(न्) तत्कृतान् गुणान् ।

अन्तः(फ्) प्रविष्ट आधत्त, एवं(न्) देहगुणान् परः ॥ 9॥

जसा लाकडाशी संबंधित असून त्याहून वेगळा असलेला अग्नी लाकडाच्या आकारानुसार लहान-मोठा, पेटणारा-विझणारा असा लाकडाचे गुण स्वतः घेताना दिसतो, त्याचप्रमाणे आत्मासुद्धा देहात असल्यामुळे वेगळा असूनही देहाचे गुण धारण करतो.

योऽसौ गुणैर्विरचितो, देहोऽयं(म्) पुरुषस्य हि ।

संसारस्तन्निबन्धोऽयं(म्), पुं(म्)सो विद्याच्छिदात्मनः ॥ 10॥

हे मनुष्याचे शरीर त्रिगुणांचेच बनलेले आहे. या गुणांमध्ये 'मी-माझे' पण असल्यामुळे माणसाच्या मागे संसार लागला आहे. त्याचा नाश आत्मज्ञानानेच होतो.

तस्माज्जिज्ञासयाऽऽत्मान- मात्मस्थं(ङ्) केवलं(म्) परम् ।

सं(ङ्)गम्य निरसेदेतद्- वस्तुबुद्धिं(म्) यथाक्रमम् ॥ 11॥

म्हणून विवेकाने देहामध्ये असणाऱ्या केवलस्वरूप परमात्म्याला नीट जाणून, स्थूल-सूक्ष्म देहांविषयीची सत्यबुद्धी सोडून द्यावी.

आचार्योऽरणिराद्यः(स्) स्या- दन्तेवास्युत्तरारणिः ।

तत्सन्धानं(म्) प्रवचनं(वँ), विद्यासन्धिः(स्) सुखावहः ॥ 12॥

(यज्ञासाठी अग्नी उंबराच्या लाकडांतून उत्पन्न करतात.त्यात खाली लाकूड असते.त्याला अधरअरणी'म्हणतात. वरच्याला 'उत्तर-अरणी' म्हणतात आणि मधल्या उभ्या रवीसारख्या लाकडाला 'मंथनकाष्ठ' म्हणतात. हे घुसळले असता अग्नी उत्पन्न होतो. येथे हे उदाहरण आहे.) ज्ञानरूप अग्नी उत्पन्न होणाऱ्या क्रियेत आचार्य खालचे लाकूड आहेत, आणि शिष्य वर्चे. ज्ञानरूप प्रवचन हे मंथनकाष्ठ होय. त्यापासून आत्मज्ञानरूपी अग्नी निर्माण होतो. तो परमानंद देणारा आहे .

वैशारदी सातिविशुद्धबुद्धिर्-

धुनोति मायां(ङ्) गुणसम्प्रसूताम् ।

गुणां(म्)श्च सन्दह्य यदात्ममेतत्,

स्वयं(ञ्) च शाम्यत्यसमिद् यथाग्निः ॥ 13॥

बुद्धिमान शिष्यांची ती अत्यंत शुद्ध झालेली बुद्धी गुणांपासून उत्पन्न झालेल्या विषयस्वरूप मायेचे भस्म करते. जेव्हा जग उत्पन्न करणारे गुण भस्म होतात, तेव्हा इंधनाला जाळून स्वतः शांत होणाऱ्या अग्नीप्रमाणे ती बुद्धीही नाश होऊन जाते.

अथैषां(ङ्) कर्मकर्तृणां(म्), भोक्तृणां(म्) सुखदुःखयोः ।

नानात्वमथ नित्यत्वं(लँ), लोककालागमात्मनाम् ॥ 14॥

मन्यसे सर्वभावानां(म्), सं(म्)स्था ह्यौत्पत्तिकी यथा ।

तत्तदाकृतिभेदेन, जायते भिद्यते च धीः ॥ 15॥

एवमप्यं(ङ्)ग सर्वेषां(न्), देहिनां(न्) देहयोगतः ।

कालावयवतः(स्) सन्ति, भावा जन्मादयोऽसकृत् ॥ 16॥

जर तुला असे वाटत असेल की, कर्म करणारे व त्यांना कर्माची सुख-दुःखादी फळे भोगणारे जीव अनेक आहेत, तसेच कर्मांचे फलस्वरूप लोक, कर्मांच्या उपभोगासाठी देह, ती कर्मे सांगणारी शास्त्रे, कर्मांपासून मिळणारे शरीर, हे सर्व नित्य आहे, त्याचप्रमाणे सर्व पदार्थ प्रवाहरूपाने नित्य असून सत्य आहेत व त्या त्या आकारानुसार ज्ञान उत्पन्न होते नष्ट होते, तर हे उद्धवा! सर्वच मनुष्यांना देह व काळाचे विभाग यांच्यामुळे प्राप्त होणाऱ्या जन्मादिक अवस्था नित्य मनाला लागतील व त्यांना मोक्ष कधीच मिळणार नाही.

अत्रापि कर्मणां(ङ्) कर्तु- रस्वातन्त्र्यं(ञ्) च लक्ष्यते ।

भोक्तुश्च दुःखसुखयोः(ख्), को न्वर्थो विवशं(म्) भजेत् ॥ 17॥

शिवाय या जगात कर्म करणारा व त्यांची सुख-दुःखे भोगणारा मनुष्यप्राणी संपूर्णपणे परतंत्र आहे. अशा पराधीन प्राण्याला कोणता विषय सुख देऊ शकेल?

न देहिनां(म्) सुखं(ङ्) किञ्चिद् , विद्यते विदुषामपि ।

तथा च दुःखं(म्) मूढानां(वँ), वृथाहं(ङ्)करणं(म्) परम् ॥ 18॥

यदि प्राप्तिं(वँ) विघातं(ञ्) च, जानन्ति सुखदुःखयोः ।

तेऽप्यद्धा न विदुर्योगं(म्), मृत्युर्न प्रभवेद् यथा ॥ 19॥

या जगात असे दिसते की, उत्तम कर्म करू जाणणाऱ्यांनाही सुख मिळत नाही आणि कर्म न जाणणाऱ्या मूर्खांनाही दुःख भोगावे लागत नाही. अशा स्थितीत कर्मामुळे सुख मिळवण्याचा अहंकार व्यर्थ आहे. जरी सुख-दुःखांची प्राप्ती आणि नाश कसा होतो, हे एखाद्याने जाणले, तरीसुद्धा मृत्यू केव्हा येईल व तो कसा टाळावा, हे तर ज्ञानी कोणालाही माहीत नाही

को न्वर्थः(स्) सुखयत्येनं(ङ्), कामो वा मृत्युरन्तिके ।

आघातं(न्) नीयमानस्य, वध्यस्येव न तुष्टिदः ॥ 20॥

वधस्थनाकडे नेल्या जाणाऱ्या माणसाला ज्याप्रमाणे कोणतीही भोगसामग्री संतुष्ट करू शकत नाही, त्याचप्रमाणे मृत्यू जवळ असणाऱ्या माणसाला कोणता पदार्थ किंवा कामना सुखी करू शकेल?

श्रुतं(ञ्) च दृष्टवद् दुष्टं(म्), स्पर्धासूयात्ययव्ययैः ।

बह्वन्तरायकामत्वात्, कृषिवच्चापि निष्फलम् ॥ 21॥

या लोकांप्रमाणेच परलोकसुद्धा सदोषच आहे. तेथेसुद्धा स्पर्धा, असूया, पुण्य क्षीण होणे आणि नाश पावणे, हे सर्व आहेच. जशी पुष्कळ कष्टांनी केलेली शेती अतिवृष्टी, अनावृष्टी, यांसारख्या संकटांनी नष्ट होते, त्याचप्रमाणे परलोकासाठी केलेल्या प्रयत्नांत विघ्ने येतात व ते प्रयत्नही विफल होतात.

अन्तरायैरविहतो, यदि धर्मः(स्) स्वनुष्ठितः ।

तेनापि निर्जितं(म्) स्थानं(यँ), यथा गच्छति तच्छृणु ॥ 22॥

जर कोणतेही विघ्न निर्माण न होता चांगल्या तऱ्हेने यज्ञ इत्यादींचे अनुष्ठान पूर्ण झाले, तर त्यामुळे परलोकाची प्राप्ती कशी होते ते ऐक.

इष्ट्वेह देवता यज्ञैः(स्), स्वर्लोकं(यँ) याति याज्ञिकः ।

भुं(ञ्)जीत देववत्तत्र, भोगान् दिव्यान् निजार्जितान् ॥ 23॥

यज्ञ करणारा पुरुष यज्ञाचे द्वारा देवतांची आराधना करून स्वर्गात जातो आणि तेथे आपल्या पुण्यकर्मांच्या द्वारा प्राप्त केलेले दिव्य भोग देवतांप्रमाणे भोगतो.

स्वपुण्योपचिते शुभ्रे , विमान उपगीयते ।

गन्धर्वैर्विहरन् मध्ये, देवीनां(म्) हृद्यवेषधृक् ॥ 24॥

त्याच्या पुण्यानुसार त्याला एक तेजस्वी विमान मिळते आणि तो त्यातून अप्सरांच्याबरोबर मनोहर वेष घेऊन विहार करतो. तेव्हा गंधर्व त्याच्या गुणांचे गायन करतात.

स्त्रीभिः(ख्) कामगयानेन, किं(ङ्)किणीजालमालिना ।

क्रीडन् न वेदात्मपातं(म्), सुराक्रीडेषु निर्वृतः ॥ 25॥

त्याच्या इच्छेनुसार जाणाऱ्या व घंटांच्या माळा लावलेल्या विमानातून तो देवतांच्या विहारस्थळांमध्ये अप्सरांसह आनंदाने क्रीडा करीत असता आपण लवकरच येथून खाली भूतलावर पडू, याचे त्याला भानही राहत नाही.

तावत् प्रमोदते स्वर्गे, यावत् पुण्यं(म्) समाप्यते ।

क्षीणपुण्यः(फ्) पतत्यर्वा- गनिच्छन् कालचालितः ॥ 26॥

जोपर्यंत त्याचे पुण्य शिल्लक असते, तोपर्यंत तो स्वर्गामध्ये मौज-मजा करतो. पुण्य संपताच, त्याची इच्छा नसतानाही कालगतीनुसार तो खाली पडतो.

यद्यधर्मरतः(स्) सङ्गा- दसतां(वँ) वाजितेन्द्रियः ।

कामात्मा कृपणो लुब्धः(स्), स्तैणो भूतविहिं(म्)सकः ॥ 27॥

पशूनविधिनाऽऽलभ्य, प्रेतभूतगणान् यजन् ।

नरकानवशो जन्तुर्- गत्वा यात्युल्बणं(न्) तमः ॥ 28॥

जर एखादा मनुष्य दुष्टांच्या संगतीत सापडून अधर्माने वागू लागला, किंवा आपल्या इंद्रियांच्या अधीन होऊन स्वच्छंदपणे वागू लागला, कंजूषपणे वागू लागला, लोभी झाला, स्त्रीलंपट झाला किंवा प्राण्यांना त्रास देऊ लागला आणि शास्त्र-विधानाच्या विरुद्ध पशूंचा बळी देऊन भूत-प्रेतांची उपासना करू लागला, तर त्याला त्याच्या इच्छेविरुद्ध घोर अंधकारमय नरकात जावे लागते.

कर्माणि दुःखोदर्काणि, कुर्वन् देहेन तैः(फ्) पुनः ।

देहमाभजते तत्र , किं(म्) सुखं(म्) मर्त्यधर्मिणः ॥ 29॥

लोकानां(लँ) लोकपालानां(म्), मद्भयं(ङ्) कल्पजीविनाम् ।

ब्रह्मणोऽपि भयं(म्) मत्तो, द्विपरार्धपरायुषः ॥ 30॥

सकाम कर्माचे फळ दुःखच आहे. जो जीव शरीरामध्ये अहंता-ममता धरून तशी कर्मे करतो, त्यांची फळे भोगण्यासाठी त्याला पुन्हा जन्म घ्यावा लागतो. मर्त्य जीवाला अशा स्थितीत काय सुख मिळणार? एक कल्पपर्यंत आयुष्य असणाऱ्या लोक व लोकपाल यांना माझे भय आहे. दोन परार्ध आयुष्य असणाऱ्या ब्रह्मदेवालासुद्धा माझ्यापासून भय आहे.

गुणाः(स्) सृजन्ति कर्माणि, गुणोऽनुसृजते गुणान् ।

जीवस्तु गुणसं(यँ)युक्तो, भुङ्क्ते कर्मफलान्यसौ ॥ 31॥

यावत् स्याद् गुणवैषम्यं(न्), तावन्नानात्वमात्मनः ।

नानात्वमात्मनो यावत् , पारतन्त्र्यं(न्) तदैव हि ॥ 32॥

सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण इंद्रियांना त्यांच्या कर्मे करण्यासाठी प्रवृत्त करतात आणि इंद्रिये कर्मे करतात. अशा प्रकारे अज्ञानाने इंद्रियांनी केलेल्या कर्माशी संबंध जोडून कर्माचे फळ भोगू लागतो. जोपर्यंत शरीर इत्यादींमध्ये 'मी- माझे'पणाचा अभिमान आहे, तोपर्यंत आत्म्याच्या अनेकत्वाचा भ्रम नाहीसा होत नाही. जोपर्यंत हा अज्ञानमूलक भ्रम नाहीसा होत नाही, तोपर्यंत तो जीव परतंत्रच राहणार.

यावदस्यास्वतन्त्रत्वं(न्), तावदीश्वरतो भयम् ।

य एतत् समुपासीरं(म्)स्- ते मुह्यन्ति शुचार्पिताः ॥ 33॥

जोपर्यंत जीवाला पारतंत्र्य जाणवते, तोपर्यंत ईश्वराचे वाटणारे भय कायमच असते. जो अशा प्रकारे गुणांच्या विळख्यात सापडून राहतो, त्याला शोक आणि मोह होतच राहतात.

काल आत्माऽऽगमो लोकः(स्), स्वभावो धर्म एव च ।

इति मां(म्) बहुधा प्राहुर्- गुणव्यतिकरे सति ॥ 34॥

प्रिय उद्धवा! जेव्हा मायेच्या गुणांमध्ये क्षोभ होतो, तेव्हा काल, आत्मा, वेद, लोक, स्वभाव आणि धर्म अशा अनेक रूपांनी व नावांनी मीच एका ओळखला जातो.

उद्धव उवाच

गुणेषु वर्तमानोऽपि, देहजेष्वनपावृतः ।

गुणैर्न बद्ध्यते देही, बद्ध्यते वा कथं(वँ) विभो ॥ 35॥

उद्धव म्हणाला— भगवान! हा अलिप्त आत्मा देह, इंद्रिये इत्यादी गुणांमध्ये, तसेच देहाने केलेली कर्मे व त्यांचा फळे यांमध्ये राहत असूनही त्यांपासून मुक्त कसा राहतो? किंवा वरील गुणांनी बद्ध कसा होतो?

कथं(वँ) वर्तेत विहरेत्, कैर्वा ज्ञायेत लक्षणैः ।

किं(म्) भुं(ञ्)जीतोत विसृजेच्-छयीतासीत याति वा ॥ 36॥

बद्ध किंवा मुक्त पुरुष कसा असतो? कसा वागतो? तो कोणत्या लक्षणांनी ओळखला जातो? काय खातो? मलत्याग इत्यादी कसे करतो? झोपतो कसा, बसतो कसा आणि चालतो कसा?

एतदच्युत मे ब्रूहि, प्रश्नं(म्) प्रश्नविदां(वँ) वर ।

नित्यमुक्तो नित्यबद्ध, एक एवेति मे भ्रमः ॥ 37॥

हे अच्युता! प्रश्नाचे मर्म जाणणाऱ्यांमध्ये आपण श्रेष्ठ आहात. एकच आत्मा अनादी गुणांच्या संबंधामुळे नित्यबद्धही आहे आणि मोक्ष नित्य असल्यामुळे नित्यमुक्तही आहे. या परस्परविरोधी दिसणाऱ्या गोष्टींमुळे मला संशय उत्पन्न झाला आहे. तरी आपण माझ्या या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायामेकादशस्कन्धे भगवदुद्धवसं(वँ)वादे दशमोऽध्यायः ॥ 10॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥